# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.४२३४/२०२३/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| सौ.उज्वला जयंत पाटील, रा.बी/४०२, युगंधर सुदामा, गोखलेवाडी, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ २०१. | उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. | कार्यकारी अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. |

**<u>विवेचन</u>**

उपरोक्त द्वितीय अपिल संदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक ०६/०४/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये दि.०१/०८/२०२२ ते दि.०६/०४/२०२३ या कालावधीतील नगर विकास विभाग, मंत्रालय (मुख्य इमारत) ४ था मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ यांचे विषयांकित पत्रातील अ.क्र.०२, संदर्भ क्र.१३९९ नुसार, नमूद केलेप्रमाणे, मी दि.१९/०८/२०२२ रोजीच्या अर्जाद्वारे संबंधितांविरोधात मा.न्यायालयात दाद मागणेसाठी, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७ नुसारची परवानगी मिळणेकरिता विनंती केली होती. त्या अनुषंगाने, नगर विकास त्रिभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडून मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना दि.३०/११/२०२२ रोजीच्या विषयांकित पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तरी मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी नगर विकास विभागाच्या विषयांकीत पत्रानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची सत्यप्रत मिळावी अशी माहिती मागितली आहे. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २२/०५/२०२५ रोजी सुनावणीअंती खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक (श्री.रविंद्र बागुल) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक श्री.रविंद्र बागुल यांनी दि.०९/१०/२०२५ अन्वये आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, श्रीमती उज्वला पाटील यांनी दि.०६/०४/२०२३ अन्वये अर्ज दाखल केलेला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.२६/०४/२०२३ अन्वये अर्जदार यांना पत्र देवून कळविले होते. तथापि सदर पत्रात त्यांचे माहिती अधिकार अंतर्गतच्या दि.०६/०४/२०२३ या अर्जाचा उल्लेख करावयाचा नजरचुकीने राहून गेला होता. तसेच अर्जदार यांना दिलेल्या पत्राची प्रत शासनास देखील देण्यात आलेली आहे. त्यानंतर अर्जदार यांनी दि.१२/०५/२०२३ अन्वये प्रथम अपिल केले होते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१७/०१/२०२४ च्या सुनावणीनुसार दि.१२/०२/२०२४ अन्वये अर्जदार यांना पुनश्च: माहिती देण्यात आली आहे. त्यामध्ये अर्जदार यांना माहिती देण्यास

टाळाटाळ करण्याचा कोणताही हेतू नव्हता. तसेच दि.१६/०४/२०२५ अन्वये कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी सदर ठिकाणी देण्यात आलेली सुधारित बांधकाम परवानगी प्रस्तावास नियमानुसार इकडील कार्यालयाकडून परवानगी देण्यात आलेली आहे असे कळविले आहे. तसेच आयोगाच्या आदेशानुसार अर्जदार यांना सदर अहवालाची प्रत पुनश्च: उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सबब माझ्या खुलाशाचा सहानुभूतीने विचार करुन माझ्यावर कोणतीही कारवाई करु नये ही नम्र विनंती.

३. प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षास येत आहे की, अपिलार्थी यांनी दि.०६/०४/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यकारी अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.२६/०४/२०२३ च्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविली असल्याचे दिसून येते आणि सदर पत्राची प्रत शासनास देखील पाठविली असल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांना पाठविलेल्या दि.२६/०४/२०२३ च्या पत्रात एकूण १२ संदर्भ नमूद केलेले असून त्यामध्ये माहिती अधिकार अर्जाचा उल्लेख करण्याचे नजरचुकीने राहून गेल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक असल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थी यांनी दि.१०/०५/२०२३ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३/०१/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.१२/०२/२०२४ च्या पत्रान्वये अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविल्याचे दिसून येते. याव्यतिरिक्त आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार देखील विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी अपिलार्थीस दि.०९/१०/२०२५ च्या पत्रान्वये पुनश्च: माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. उपरोक्त बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक श्री.रविंद्र बागुल यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केली अशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक श्री.रविंद्र बागुल यांनी आयोगाकडे सादर केलेला खुलासा समर्थनीय असल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक श्री.रविंद्र बागुल यांनी आयोगाकडे सादर केलेला लेखी खुलासा समाधानकारक असल्यामुळे मान्य करण्यात येऊन त्यांच्याविरुध्द प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.४२३४/२०२३/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जावक क्र. L09L

दिनांक :- 15 OCT 2025